# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:24.03.2026** **वारः मंगळवार**

---

1. जागतिक अनिश्चिततेच्या काळातही भारत आत्मविश्वासाने वाटचाल करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. पश्चिम आशियातील संघर्षाच्या मुद्द्यावर परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांची विविध देशांच्या नेत्यांशी चर्चा
3. आसाम, केरळम् आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्जांची आज छाननी
4. कोलंबियामध्ये लष्करी विमानाला झालेल्या अपघातात 66 जणांचा मृत्यू आणि
5. पहिल्या राष्ट्रीय इनडोअर ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेला आजपासून भुवनेश्वरमध्ये सुरुवात

**<u>पंतप्रधान समिट</u>**

पश्चिम आशियातील तणावपूर्ण घडामोडींच्या काळात, विविध देशांशी मजबूत संबंध निर्माण करण्याची भारताची क्षमता, ठोस निर्णय घेण्याची तयारी आणि संकटाच्या काळातील व्यवस्थापनाची कार्यक्षमता अधोरेखित झाली आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत एका खासगी माध्यम समूहाने आयोजित केलेल्या संमेलनाला त्यांनी काल संबोधित केलं. गेल्या 28 फेब्रुवारीपासून जागतिक पातळीवर अनिश्चितता असतानाही भारत आत्मविश्वासाने विकासाच्या वाटेवर वाटचाल करत आहे. देश आता आव्हानांपासून दूर पळत नाही, तर त्यांचा ठामपणे सामना करत आहे, असं पंतप्रधान म्हणाले. अत्यंत कठीण आणि युद्धसदृश परिस्थितीत भारताच्या धोरणांची, रणनीतीची आणि क्षमतेची जागतिक स्तरावर दखल घेतली जात आहे, आखाती देश, ग्लोबल साऊथ, पश्चिमेकडील देश आणि शेजारी राष्ट्र या सर्वांसाठी भारत एक विश्वासार्ह भागीदार देश म्हणून उदयास आला असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी इंधन, खतं आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकार आवश्यक ती सर्व पावलं उचलत असल्याची ग्वाही पंतप्रधानांनी दिली. देशातील 140 कोटी नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे, संकटाच्या काळातही देश पुढे जात असून अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचं मोदी म्हणाले.

**<u>मोदी-लोकसभा</u>**

पश्चिम आशियातील संघर्ष थांबवण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरी हाच एकमेव मार्ग असल्याचा पुनरुच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधानांनी काल लोकसभेत निवेदन दिलं. पश्चिम आशियातील परिस्थिती तणावपूर्ण आहे, अशा परिस्थितीत देशातील नागरिकांनी एकजूट दाखवावी आणि सज्ज राहावं असं आवाहन त्यांनी केलं. पश्चिम आशियात संघर्ष सुरू असला, तरी भारतात ऊर्जा सुरक्षेचं कोणतंही संकट नाही, देशभरात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू आहे, असं पंतप्रधान म्हणाले. या संघर्षामुळे, होर्मुझ सामुद्रधुनी मार्गे होणाऱ्या कच्चे तेल, वायू आणि खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होत असला, तरी देशातील पेट्रोल, डिझेल आणि गॅस पुरवठा स्थिर ठेवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं पंतप्रधानांनी स्पष्ट केलं.

**<u>लोकसभा</u>**

लोकसभेत काल वित्त विधेयक चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी घेण्यात आलं. 2026-27 या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारच्या आर्थिक प्रस्तावांची अंमलबजावणी करणारं हे विधेयक आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हे विधेयक मांडलं. चर्चेच्या सुरुवातीला काँग्रेसच्या डॉ. अमर सिंग यांनी देशातल्या बेरोजगारीचा प्रश्न उपस्थित केला. सरकारकडून दिलेली करसवलत ही काही निवडक कंपन्यांनाच फायदेशीर ठरत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**परराष्ट्रमंत्री**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबिओ यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. या चर्चेत पश्चिम आशियातील संघर्ष आणि त्याचा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम यावर मुख्यतः चर्चा झाली, असं जयशंकर यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. ऊर्जा सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवरही दोन्ही नेत्यांनी विचारविनिमय केला.

डॉ. जयशंकर यांनी आखाती देशांच्या, गल्फ कोऑपरेशन कौन्सिलच्या सदस्य देशांच्या राजदूतांशीही चर्चा केली. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसह बहरीन, ओमान, कुवेत आणि कतार या देशांच्या राजदूतांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी पश्चिम आशियातील परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये मिळून सुमारे 80 लाख भारतीय वास्तव्यास आहेत. इथल्या भारतीय समुदायाला सातत्याने दिल्या जाणाऱ्या सहकार्याबद्दल डॉ. जयशंकर यांनी संबंधित देशांचे आभार मानले.

तत्पूर्वी जयशंकर यांनी श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री विजिता हेराथ यांच्याशीही दूरध्वनीवरून संवाद साधला. पश्चिम आशियातील संघर्षाचे दोन्ही देशांवर होत असलेले परिणाम, तसंच शेजारी प्रथम हे भारताचं धोरण आणि ‘व्हिजन महासागर’ या प्रकल्पाबाबतही यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

**ट्रम्प**

होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी दिलेल्या मुदतीत आणखी पाच दिवसांची वाढ करत असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल समाज माध्यमावर जाहीर केलं. त्यामुळे अमेरिका पुढच्या पाच दिवसांसाठी इराणच्या वीजनिर्मिती प्रकल्पांवरचे हल्ले थांबवणार आहे. अमेरिका आणि इराणच्या अधिकाऱ्यांमध्ये अलिकडेच झालेली चर्चा यशस्वी झाली असून त्यातून तोडगा निघू शकेल अशी आशा ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. संघर्षावर तोडगा काढण्याच्या उद्देशाने दोन्ही बाजूंकडून प्रयत्न होत असल्यामुळे या वाटाघाटी आठवडाभर सुरू राहतील, असंही ट्रम्प यांनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं.

**ट्रम्प-इराण**

इराणच्या तेलावरील निर्बंध तात्पुरते शिथिल करण्याच्या आपल्या प्रशासनिक निर्णयाचंही अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समर्थन केलं आहे. पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणला आर्थिक फायदा मिळवून देणं हा या निर्णयाचा उद्देश नसून, जागतिक तेल पुरवठा स्थिर करणं हा उद्देश आहे, असंही ट्रम्प यांनी स्पष्ट केलं.

**इराण-संसद**

दरम्यान, अमेरिकेसोबत कोणत्याही प्रकारच्या वाटाघाटी झालेल्या नाहीत असं इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी स्पष्ट केलं आहे.

**विधानसभा**

आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया काल पूर्ण झाली आहे. उमेदवारी अर्जांची छाननी आज केली जाईल. तर उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत 26 मार्चला असणार आहे. या दोन राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशात एकाच टप्प्यात पुढील महिन्याच्या 9 एप्रिलला मतदान पार पडेल. तर तामिळनाडू विधानसभा निवडणुकांसाठी आणि पश्चिम बंगालमधील मतदानाच्या पहिल्या टप्प्यासाठीची अधिसूचना या महिन्याच्या 30 तारखेला जारी केली जाईल. तामिळनाडूमध्ये 23 एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होईल. तर पश्चिम बंगालमध्ये 23 आणि 29 एप्रिल अशा दोन टप्प्यांत मतदान घेतलं जाईल. पश्चिम बंगालमधील मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना 2 एप्रिल रोजी जारी केली जाईल. या चारही राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशात 4 मे रोजी मतमोजणी होईल.

**प.बंगाल-मतदारयादी**

भारतीय निवडणूक आयोगानं विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेअंतर्गत पश्चिम बंगालची पहिली पूरक मतदार यादी काल प्रकाशित केली. मतदान केंद्रनिहाय असलेली ही यादी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे,असं असं पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज कुमार अग्रवाल यांनी सांगितलं आहे.

**विधीमंडळ**

वन्यजीव संरक्षण महाराष्ट्र सुधारणा विधेयक 2026 विधानपरिषदेनं एकमतानं मंजूर केलं. मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी राज्य सरकारच्या परवानगीने बिबट्यांचं स्थानांतरण करणं, संख्येचं व्यवस्थापन करणं यासाठी वन्यजीव रक्षकाला आवश्यक पावलं उचलण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या दुसरी सुधारणा विधेयक, 2026 लाही विधानपरिषदेनं काल मंजुरी दिली. राज्यातले कालबाह्य झालेले, कायदे रद्द करणारं महाराष्ट्र निरसन विधेयकही, विधानपरिषदेत मंजूर झालं. ही तिन्ही विधेयकं विधानसभेनं याआधीच मंजूर केली आहेत.

**क्षयरोग**

जागतिक क्षयरोग प्रतिबंध दिन आज पाळण्यात येत आहे. टीबी मुक्त भारत अभियान-ही 100 दिवसांची विशेष मोहीम आजपासून देशभरात राबवण्यात येणार असून, महाराष्ट्रातही या मोहिमेची व्यापक अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत 11 हजार 91 जोखीमग्रस्त गावं आणि शहरी प्रभागांमध्ये विशेष तपासणी करण्यात येणार येणार आहे.

**कोलंबिया-विमान अपघात**

कोलंबियामध्ये काल एका लष्करी विमानाचा अपघात झाला. उड्डाण केल्यानंतर काही वेळातच हे लष्करी विमान कोसळलं. या विमानात 125 लष्करी जवान होते; या दुर्घटनेत 66 जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त डीडी न्यूज या वृत्त वाहिनीनं दिलं आहे. काही जणांना वाचवण्यात आलं असून मदत आणि बचाव कार्य अजूनही सुरू आहे.

**ॲथलेटिक्स**

पहिल्या राष्ट्रीय इनडोअर ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेला आजपासून ओडिशातल्या भुवनेश्वर इथल्या कलिंगा मैदानावर सुरवात होत आहे. भारतीय ॲथलेटिक्समध्ये एका नव्या पर्वाची नांदी ठरणाऱ्या या स्पर्धेच्या पहिल्याच आवृत्तीला मोठा प्रतिसाद लाभला आहे. दोन दिवस चालणाऱ्या या क्रीडा स्पर्धेत 97 महिला खेळाडूंसह 278 स्पर्धकांनी सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा वरिष्ठ आणि 20 वर्षांखालील अशा दोन्ही वयोगटांमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.